# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०७ जुलै, २०२५ / आषाढ १६, १९४७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**<br>**(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(४) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

**पालघर (जि.पालघर) शहरातील सांडपाण्यामुळे पाणेरी नदी प्रदूषित होत असल्याबाबत**

**(१) * १०६२३ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.पालघर) शहरातील सांडपाणी गेल्या अनेक वर्षांपासून थेट माहीमच्या पाणेरी नदीत सोडण्यात येत असल्याने होणारे जलप्रदूषण रोखण्यासाठी मल:निस्सारण प्रकल्प उभारणे आवश्यक असताना सदर प्रकल्पाचे काम तांत्रिक अडचणींमुळे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर नगरपरिषद क्षेत्रातील नैसर्गिक नाले व गृह संकुलातील सांडपाणी थेट पाणेरी नदीत सोडले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर शहराच्या पूर्वेकडे सांडपाणी प्रकल्पासाठी २५०० चौरस मीटर जागा तर पश्चिमेकडे ९६०४ चौरस मीटर जागा लागणार असून सदर जागेचा ताबा देण्यासंदर्भात नगर परिषदेने शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणेरी नदीचे प्रदूषण रोखण्यासह मलनिःस्सारण प्रकल्प तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) पालघर नगरपरिषदेच्या विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक-२५८ (पंप हाऊस) सर्व्हे क्र.८४ ही जागा कृषी संशोधन केंद्र, पालघर यांचेकडे असल्याने सदरची जागा नगरपरिषदेस हस्तांतरीत करण्याबाबत दि.२२/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेने कळविले आहे. पंप हाऊससाठी उर्वरित जागा खाजगी मालकीच्या असल्याने त्या अद्याप नगरपरिषदेस हस्तांतरीत झालेल्या नाहीत. स्वच्छ भारत मिशन-टप्पा-२ अंतर्गत पालघर शहरातील मलनिस्सारण प्रकल्पासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे यांना सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील उमरखाडी येथील जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या समुह पुनर्विकासाबाबत**

**(२) * ११५६२ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या उपकरप्राप्त इमारतींचे समूह पुनर्विकास योजनेअंतर्गत पुनर्विकास करण्याचे राज्य शासन तथा म्हाडाचे धोरण असतानाही सन २०१९ मध्ये उमरखाडी पुनर्विकास समितीने ८१ इमारतींच्या सादर केलेल्या प्रस्तावास अद्यापही शासनाने मान्यता दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी उमरखाडी समुह पुनर्विकास समितीचे अध्यक्ष, श्री.संजीव चिंबुलकर यांनी सर्व त्रुटींची पूर्तता केली असून याबाबत आयोजित बैठकीत म्हाडा उपाध्यक्ष व मुख्य अधिकारी यांनी प्रस्तावास मान्यता देण्यास अनुकूलता दर्शवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची छाननी व व्यवहार्यता तपासणी म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडून पुर्ण झाली असतानाही म्हाडाने सदर प्रकरण स्थगित ठेवल्याचे दिनांक २८ मे, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुमारे १९६० रहिवाशांच्या पुनर्विकास प्रस्तावास तातडीने मंजूरी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही,

उमरखाडी समूह पुनर्विकास योजनेमधील भाडेकरु/ रहिवाश्यांच्या विविध मागण्यांमुळे प्रकल्प व्यवहार्य होत नसल्यामुळे उमरखाडी येथील रहिवाश्यांसोबत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ प्राधिकरण यांच्याकडे दि.१२.०१.२०२३ रोजी बैठक घेण्यात आली होती.

उमरखाडी पुनर्वसन समितीच्या वतीने श्री. संजीव चिंबुलकर यांनी दि.१०.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये समुह पुनर्विकास प्रकल्प राबविण्याबाबत प्रस्ताव म्हाडास सादर केला होता. सदर प्रस्तावासोबत खाजगी मालकांची संमती सादर न केल्यामुळे, खाजगी मालकांच्या इमारतीचा समावेश समुह पुनर्विकास योजनेमध्ये करणे शक्य होत नसल्याचे श्री. संजीव चिबुलकर यांना दि.२७.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंडळाने कळविले होते.

दरम्यान उमरखाडी पुनर्वसन समितीने एकूण ८१ इमारतींच्या समुह पुनर्विकासाचा प्रस्ताव दि.०३.१२.२०२४ रोजी म्हाडा प्राधिकरणाकडे सादर केला होता.

सदर प्रस्तावाच्या अनूषंगाने प्रकल्प व्यवहार्यतेची फेरतपासणी करण्याकरीता वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर वास्तुशास्त्रज्ञा कडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुनर्विकासाबाबतची पुढील कार्यवाही म्हाडामार्फत करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अक्कलकुवा (जि.नंदूरबार) येथील बाजारपेठेत भेसळयुक्त तेलाची विक्री होत असल्याबाबत**

**(३) * १०२५७ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा (जि.नंदूरबार) येथील व्यापारी श्री. महेश तंवर व श्री. रमेश तंवर यांनी विविध कंपनीचे बनावट लेबल तयार करून त्यांची पॅकेजिंग करून बाजारपेठेत भेसळयुक्त तेलाची विक्री केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अक्कलकुवा तालुक्यातील नागरिकांना भेसळ केलेल्या तेलामुळे विविध आजारांना सामोरे जावे लागत असून या व्यवसायाकडे प्रशासन पूर्णतः दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तंवर कुटुंबीयाचे अक्कलकुवा शहरात तालुक्यात व बाहेरच्या राज्यांमध्ये अनेक अवैध धंदे असून अफिम सारख्या मादक पदार्थांच्या विक्री प्रकरणी त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीवर गुजरात राज्यात गुन्हा दाखल आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी पोलीस आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली असता योग्य चौकशी न करता चौकशी अहवाल देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२), (३), (४) व (५) अन्न व औषध प्रशासनाने दि.१०.०३.२०२५ रोजी नंदुरबार येथे मे. गोपाल प्रोव्हिजन, अक्कलकुवा, जि.नंदुरबार या आस्थापनेची तपासणी करून (१) रिफाईन्ड सोयाबीन तेल (महिका ब्राण्ड) व (२) शेंगदाणा तेल (कमला) या अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणास्तव घेतले. सदर अन्न नमुन्यांचा विश्लेषण अहवाल हा मानकानुसार नसल्याचे घोषित झाला आहे.

सदर विश्लेषण अहवालाविरूद्ध विक्रेत्याने अपील केल्यामुळे सदर दोन्ही अन्न नमुने Central Food Technological Research Institute, Mysore या रेफरल प्रयोगशाळेकडे फेरविश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहे. विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियमने, २०११ मधील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

अन्न व औषध प्रशासनाने सन २०२४-२५ या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यात खाद्यतेल या अन्नपदार्थाचे एकुण १२ नमुने घेण्यात आले असुन त्यांपैकी ०७ नमुने प्रमाणित, ०५ नमुने कमी दर्जाचे घोषित झाले. पाच कमी दर्जाच्या अन्नपदार्थापैकी ०३ नमुने रेफरल प्रयोगशाळेकडे फेरविश्लेषणासाठी पाठविण्यात आलेले असुन ०२ प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियमने २०११ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.

गुजरात राज्यात अफीम बाबत श्री. रमेश तवर यांचेविरुध्द सागबारा, पोलिस ठाणे (गुजरात राज्य) येथे एक गुन्हा दाखल आहे. तसेच, अक्कलकुवा पोलीस स्टेशनला श्री. महेश परमसुख तवर व श्री. सुरेश परमसुख तवर यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता व अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ मधील तरतूदीनुसार फौजदारी गुन्हा क्र. १९३/२०२१, दि. ०९.०३.२०२१ रोजी दाखल असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. सदर गुन्ह्यात सी. आर. पी. सी. १०७ प्रमाणे चॅप्टर केस क्र. ५४/२०२१ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

-----------------

**राज्यात विशेषत: महानगरपालिका, जिल्हा परिषद शाळांमध्ये बनावट दिव्यांग दाखल्याच्या आधारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(४) * ८१५९ श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यात विशेषत: बृहन्मुंबई महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका, सोलापूर व इतर जिल्हा परिषदांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती करताना दिव्यांगाचे बनावट दाखले देऊन भरती करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भरतीमध्ये संशयित ८५ दाखल्यांचे पडताळणीचे आदेश शासनाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त भरती प्रक्रियेत बनावट दाखले दिल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघ, बार्शी; शिक्षक समिती,बार्शी; मागासवर्गीय शिक्षक संघटना यांनी आंदालने सुरु केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) जिल्हा परिषद सोलापूर व इतर जिल्हा परिषदांमध्ये असे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आढळून आले नाहीत. बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत ११ दिव्यांग उमेदवारांचे प्रमाणपत्र नायर हॉस्पिटल येथे पूनर्पडताळणी करीता पाठविण्यात आले असता २ उमेदवारांचे ४० टक्के पेक्षा दिव्यांग प्रमाण कमी असल्याने त्यांना अपात्र ठरवून नियुक्ती आदेश देण्यात आले नाहीत. नाशिक महानगरपालिकेमध्ये हिंदी व उर्दु अशा दोन शिक्षकांची भरती करण्यात आली

असून या उमेदवारांकडे दिव्यांग युनिक आयडी उपलब्ध आहेत.

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांची भरती प्रक्रिया ही अभियोग्यता चाचणीमधील प्राप्त गुणांकनास अनुसरुन पवित्र पोर्टल मार्फत राबविण्यात येते.
नियुक्ती देताना शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रवर्गानुसार कागदपत्रांची पडताळणी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्या मार्फत पार पाडली जाते. दिव्यांग उमेदवाराचे प्रमाणपत्र बनावट आढळून आल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येते. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दिनांक १४.०९.२०१८ व दिनांक ०९.०९.२०२४ मध्ये तक्रार दाखल झाल्यास तक्रारीतील तथ्य विचारात घेवून दिव्यांग उमेदवारांच्या दिव्यांगत्वाची फेरतपासणी करण्याचा निर्णय नियुक्ती प्राधिकारी करतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्ह्यात रेशनच्या तांदुळाचा होत असलेला गैरव्यवहार**

**(५) * ८३६१ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात अनेक गावातुन रेशनचा तांदुळ छोटया व्यापा-यामार्फत मोठया व्यापा-यांना विकला जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राधान्यगट, अंत्योदय व एपीएल शिधापत्रीकाधाकर लाभार्थ्यांना रेशनचे धान्य पुरविले जात असून काही लाभार्थी ते घेत नसल्यामुळे शिधापत्रिकेवर मिळालेले तांदूळ खरेदीदारांना दुकान मालकच विकत असून ग्रामीण भागात तांदुळ २२ ते २५ रू. किलो या भावाने खरेदी केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर माल रेशन दुकानातून परिसरातील राईसमिल मध्ये वाहनाद्वारे पोहचविला जात असून छोटे खरेदीदार जमा झालेल्या तांदळाचे कट्टे परिसरातील राईसमिल मालकांनाच विकत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तांदळाच्या काळाबाजारावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने व संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यात आलेला तांदूळ हा रास्तभाव दुकानदार खरेदी करुन राईसमिल मालकांना विकत असलेबाबतची बाब जिल्हा पुरवठा अधिकारी, भंडारा यांचे निर्दशनास आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरात आरोग्यास हानीकारक पाणी विकले जात असल्याबाबत**

**(६) * ७३८६ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात लग्नसमारंभ किंवा दुकानांमध्ये “आरओ” नावाखाली आरोग्यास हानीकारक पाणी विकले जात असल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनातील अधिकारी यांच्या आर्थिक संगनमताने सिलबंद पाण्याच्या बाटल्या तयार करणाऱ्या कंपन्याकडून नियमाचे उल्लंघन होत असून आरोग्यास हानीकारक पाणी बाजारात विकले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्यास हानीकारक असलेले पाण्याची विक्री करणारे प्रकल्प शासनाने बंद करावेत, अशी मागणी ग्राहक संघटनांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन "आरओ" च्या नावाखाली हानीकारक पाणी विकत असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) (२) (३) व (४) अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम ३ (१) (जे) नुसार आर.ओ. प्लॅन्टव्दारे प्रक्रिया व थंड करुन फिरकीचे झाकण व तोटी असलेल्या २० लिटरच्या कॅनमध्ये पुरविण्यात येणारे पाणी अन्नपदार्थाच्या व्याख्येत/संज्ञेत येत नाही.

तसेच, अन्न सुरक्षा व मानके (Food Products Standards and Food Additives) नियमने २०११ चे नियमन २.१०.९ मध्ये "Drinking Water (Purified) means water, other than Packaged Drinking Water and natural mineral water which is offered or sold through water vending machine" असे नमूद आहे. यास्तव, सदर पाणी विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनामार्फत कारवाई करता येत नाही.

अन्न व औषध प्रशासनाच्या, नागपुर कार्यालयाने सन २०२४-२५ या वर्षात Packaged Drinking Water या अन्न पदार्थाचे एकूण ०७ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यापैकी ०३ नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले असून ०१ नमुना कमी दर्जाचा व ०३ नमुने मिथ्याछाप घोषित केले आहेत. कमी दर्जा व मिथ्याछाप अन्न नमुन्यांच्या अनुषंगाने न्यायनिर्णय प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत.

तसेच, माहे एप्रिल, २०२५ ते माहे मे, २०२५ या कालावधीत Packaged Drinking Water या अन्न पदार्थाचे एकुण ०३ नमुने घेण्यात आले असून विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे खरवड (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत**

**(७) * ७६७१ श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खरवड (ता.वरोरा, जि. चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी मांढळी टेंभुर्डा मार्गाकरिता संपादित करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना २० वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप जमिनींचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) (३) व (४)

सदर मार्गाकरिता ३.५८ हे. आर.जमिनीकरिता १९८१ मध्ये १७ शेतक-यांना भूसंपादनाचा मोबदला अदा केल्याची नोंद आहे.

-----------------

**कन्हान पंप हाऊस (ता.सावनेर, जि.नागपूर) येथे अपुरा पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(८) * ११९११ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हान पंप हाऊस (ता.सावनेर, जि.नागपूर ) येथील नगरपरिषद प्रशासनाच्या अयोग्य नियोजनामुळे परिसरात अपुरा पाणी पुरवठा होत असल्याचे माहे, मे-२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शहरातील पाण्याची समस्या सोडविण्याकरिता राबविण्यात आलेल्या निर्मल सुजल योजना व भगीरथ योजना निष्फळ ठरत असल्याचे माहे एप्रिल-मे-२०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावनेर शहरात अनेक गावांत पाण्याच्या टाक्या, पंप हाऊस, विहीरींचे बांधकाम करुनही टँकरद्वारे दोन दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सावनेर शहरात नियमित पाणी पुरवठा होण्याबाबत तसेच निर्मल सुजल योजना व भगीरथ योजनेंची अपूर्णावस्थेत असलेली कामे पूर्णत्वास नेण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

उन्हाळयाच्या दिवसात कन्हान नदीला पाणी कमी असल्यामुळे तसेच कन्हान पंप हाऊस वरुन शहरातील ७.५ लक्ष लिटर क्षमता असलेली पाण्याची टाकी भरली जाते आणि सद्यस्थितीत सावनेर शहरातील पाण्याच्या मागणीनुसार सदर क्षमता कमी आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सावनेर सुधारित पाणीपुरवठा प्रकल्पाबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून प्रकल्प विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी व त्याबाबतचे नियोजन, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिश्याची रक्कम उभारण्याबाबतची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून पाणीपुरवठा प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र नियामक निरीक्षण यंत्रणा स्थापन करण्याबाबत**

**(९) * १३०५८ श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईसह इतर महानगरांमध्ये स्विग्गी, झोमॅटो यांसारख्या फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म मार्फत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर अन्नपदार्थ मागवले जात असून उक्त प्लॅटफॉर्मवर दर्शविले जाणारे अनेक क्लाउड किचन प्रत्यक्षात अस्वच्छ असून आरोग्यास धोकादायक अशा अपरिस्थितीत अन्न तयार करीत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अस्वच्छ क्लाउड किचनमधून अन्नपुरवठा करणाऱ्या फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाने कोणतीही निरीक्षण व कारवाई यंत्रणा निर्माण केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपन्यांकडून 'हायजेनिक किचन' व 'सेफ्टी स्टँडर्ड्स' बाबत बनावट जाहिराती करून ग्राहकांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तद्नुषंगाने फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र नियामक अथवा निरीक्षण यंत्रणा स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) अन्न व औषध प्रशासनाने बृहन्मुंबई व पुणे विभागामध्ये माहे जून, २०२५ मध्ये ऑनलाईन डिलिव्हरी प्लॅटफॉर्म वरून अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्या एकूण ०४ क्लाउड किचनच्या तपासण्या करण्यात आल्या असून सर्व प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींनुसार संबंधितांवर नियमोचित कारवाई करण्यात येत आहे.

देशभरात अन्न पदार्थाचे उत्पादन, विक्री, वितरण, वाहतूक इत्यादींचे नियमन करण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ या केंद्रीय कायद्याची ५ ऑगस्ट, २०११ पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर कायद्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमनानुसार फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवर राज्याच्या अन्न व औषध प्रशासनामार्फत नियंत्रण ठेवण्यात येत आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) नगरपंचायत अंतर्गत कामाठीपुरा येथे करण्यात आलेली रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१०) * ११९६२ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) नगरपंचायत अंतर्गत प्रभाग क्र.१३, कामाठीपुरा येथील श्री सिध्देश्वर महादेव मंदीर ते नवाब हॉल (हंतोडा रोड) यादरम्यान करण्यात आलेली रस्त्यांची कामे व सुरु असलेली कामे अंदाजपत्रकानुसार न होता अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक नागरीकांनी मुख्याधिकारी तथा प्रशासक, बांधकाम विभाग, नगरपंचायत, अंजनगाव सुर्जी यांचेकडे दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास अनेक वेळा लेखी निवेदनाव्दारे तक्रार दाखल करुन निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी कंत्राटदाराविरुद्ध कारवाई करण्यासह रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
अंजनगाव नगरपंचायतीकडे सदर प्रकरणी स्थानिक नागरीकांचे दि.०७.०२.२०२५ व दि.०७.०३.२०२५ रोजीचे तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत.
(३) अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेकडे नागरिकांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सदर रस्त्यांची दि.२४.०२.२०२४ रस्त्यांची पाहणी केली असता रस्त्याच्या काही भागात तडे गेल्याचे आढळून आले. सदर रस्त्याच्या भागामध्ये m२० कॉंक्रीटचा वापर करुन ३ ते ४ इंचचा थर संपूर्ण लांबीकरीता टाकण्यात आला आहे. तदनंतर सदर रस्त्यांच्या कामाची तपासणी त्रयस्थ संस्था, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती यांच्याकडून करण्यात आली असून त्याचा अहवाल दि.०२.०६.२०२५ रोजी प्राप्त झाला असून तपासणी अहवालावरुन काम समाधानकारक झाल्याचे दिसून येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शेवगांव-पाथर्डी (जि.अहिल्यानगर) येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(११) * १३०११ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगांव-पाथर्डी येथील राष्ट्रीय महामार्ग ७५२ ई पैठण-पंढरपूर (पालखी मार्ग) व राष्ट्रीय महामार्ग खरवंडी-नवगण राजूरी या राष्ट्रीय महामार्गांना अनुक्रमे २०१७ व २०१८ साली कार्यरंभ आदेश दिले असून ७ ते ८ वर्ष उलटूनही या महामार्गाची कामे अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग ७५२ ई पंढरपूर (पालखी मार्ग) शेवगांव-पाथर्डी लांबी ३९.०४ कि.मी. व राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ खरवंडी-नवगण राजूरी लांबी १४.३० कि.मी. मधील जमीनीचे भूसंपादन मोबदले दिले नसल्यामुळे शेतकरी व बाधीतांनी महामार्गाचे कामे बंद पाडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे बंद पडून खराब रस्ते व धुळीमुळे अपघात होणे, श्वसनाचे आजार होत असल्यामुळे संबंधीत गावातील नागरिक प्रवासी व वाहनधारकांमध्ये नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन या दोन्ही राष्ट्रीय महामार्गामधील भूसंपादन निवाडे, अवार्ड झालेल्या शेतकरी व बाधीतांचे मोबदले तात्काळ अदा करून रस्त्याची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे,

पैठण-मुंगी-बोधेगांव-लाडजळगांव-शेकटा-मिडसांगवी-शिरुर- कासार हा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-ई (एकूण लांबी ५५.९३७ कि.मी.) तसेच खरवंडी-मुंगुसवाडे-भालगांव-आर्वी-औरंगपूर-नवगण राजुरी हा राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ (एकूण लांबी ३६.९०० कि.मी.) असून त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत कामे प्रगतीत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे,

राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-ई पैठण-शिरुर या महामार्गाची अहिल्यानगर जिल्हयातील ता.शेवगांव व ता.पाथर्डी मधील एकूण ३९.०४ कि.मी. लांबीपैकी ३३.४१ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीत आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१-एफ खरवंडी-नवगण राजुरी महामार्गावरील ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर मधील १४.३० कि.मी. लांबीपैकी १३.६२ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीत आहे. भूसंपादनाचा मोबदला न मिळाल्यामुळे काही ठिकाणी शेतकऱ्यांनी काम अडविले होते.

(३) हे खरे नाही,

सद्यस्थितीत पैठण-शिरुर ७५२-ई या महामार्गाच्या एकूण ५५.९३७ कि.मी. लांबीपैकी ४८.५८ कि.मी. लांबीतील दुपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच खरवंडी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ या महामार्गाच्या एकूण ३६.९० लांबीपैकी ३५.७९४ कि.मी. लांबीतील दुपदरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन उर्वरित लांबीतील काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) पैठण-शिरुर राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-ई व खरवंडी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१-एफ या महामार्गावरील उर्वरित भूसंपादनाचे अंतिम निवाडे प्राप्त झाले असून भूसंपादनासाठी लागणाऱ्या वाढीव निधीचा प्रस्ताव रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालयाकडे (MoRTH) सादर करण्यात आला आहे.

(५) भूसंपादनामुळे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे.

-----------------

**संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील कचरा डेपोला आग लागल्याबाबत**

**(१२) * ७१०१ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर ) शहरातील खुर्दनेर येथील कचरा डेपोला माहे मार्च, २०२५ मध्ये भीषण आग लागून वायु प्रदूषणात वाढ होऊन नागरीकांना श्वास घेणे त्रासदायक झाल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या घंटागाड्यांद्वारे डेपो मध्ये मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असून कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने योग्य प्रक्रिया करणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कचरा डेपोतून मिथेन गॅस पसरत असल्याने परिसरातील नागरीकांना श्वसनाचे विकार, त्वचा व संसर्गजन्य रोग यासारखे आजार उद्भवत असल्याच्या असंख्य तक्रारी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार परिसरातील वाढते प्रदुषण आटोक्यात आणण्यासाठी, व स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी शासनामार्फत कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे,
माहे एप्रिल, २०२५ मध्ये संगमनेर कचरा डेपोला आग लागली होती.
कचरा डेपोतील आगीमुळे निर्माण होणाऱ्या धुराने परिसरात राहणाऱ्या नागरिकांना श्वसनासंबंधी त्रास होत असल्याबाबतच्या तक्रारी नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या नाहीत.
(२), (३) व (४) हे खरे नाही,
घनकचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ नुसार कचरा संलकन करणे, वाहतूक करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कचऱ्यावर प्रक्रिया, विल्हेवाट लावणे व इतर आवश्यक उपाययोजना नगरपरिषदेमार्फत केल्या जातात. घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे कचऱ्यावर बायोकल्चर फवारणी करून विन्ड्रो कंपोस्टिंग व पीट कंपोस्टिंग द्वारे प्रक्रिया करण्यात येते. हॉटेल व घरगुती किचनमधील ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.
वर्गीकृत सुका कचरा संकलित करण्यात येऊन त्यासाठी Material Recovery Facility (MRF) सेंटर उपलब्ध असून बेलिंग मशीन द्वारे बेलिंग बनविण्यात येते. घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे येणाऱ्या संपूर्ण कचऱ्यावर १००% शास्त्रोक्त पद्धतीने दैनंदिन बायोमायनिंग प्रक्रिया करण्यात येते.
कचरा डेपोतून मिथेन गॅस पसरत असल्याने परिसरातील नागरीकांना श्वसन संबंधी, त्वचा, संसर्गजन्य रोग संबंधी आजार उद्भवत असल्याबाबतच्या तक्रारी नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) शहरातील धोकादायक इमारतींबाबत**

**(१३) * ९६७६ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहरात (जि.ठाणे) सुमारे १४४४ इमारती धोकादायक असल्याची अधिकृत आकडेवारी माहे एप्रिल,२०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्य करीत असलेल्या रहिवाशांचे पावसाळ्यापूर्वी तातडीने इतरत्र स्थलांतरण न केल्यास दुर्घटना घडून जीवित हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना नोटीस देवून रहिवाशांचे इतरत्र स्थलांतरण करण्याबाबत शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे,

नगर विकास विभाग, शासन परिपत्रक, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार महापालिका क्षेत्रातील एकूण १४४४ इमारत मालकांना स्ट्रक्चरल ऑडीट करून घेण्याबाबत महानगरपालिकेमार्फत नोटीस बजाविण्यात आल्या होत्या. तद्नंतर महानगरपालिकेचे पदनिर्देशित अधिकारी व स्थापत्त अभियंता यांचेमार्फत सदर मिळकतींचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे) २८९,
सी-२ए (इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे) ७३८
सी-२बी (इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरूस्ती करणे) ३७२,
सी-३ (इमारतीची किरकोळ दुरूस्ती करणे) ४५
याबाबत नियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे,

खाजगी इमारतीमध्ये वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांचे स्थलांतरण करून इमारत रिक्त करून घेण्याची कार्यवाही पोलीस विभागाच्या समन्वयाने करण्यात येत आहे.

(४) व (५) महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारतींपैकी सी-१ प्रवर्गातील एकूण २८९ अतिधोकादायक मिळकतींपैकी २७ मिळकती निष्कासित करण्यात आल्या असून, ११ मिळकतींबाबत मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. तसेच, सी-१ मध्ये घोषित केलेल्या इमारतींपैकी एकूण ४३ घरमालक/भोगवटादार यांनी इमारतीचे स्ट्रक्चरल रिपोर्ट सादर केले असून, सदर इमारतींना दुरूस्ती परवानगी देण्यात आली आहे.

उर्वरित १२० इमारतींचा पाणी व वीज पुरवठा खंडीत करून ५८ मिळकती संपूर्णत: रिक्त करण्यात आल्या आहेत. शिल्लक राहिलेल्या ८८ मिळकतींतील रहिवाशांचे स्थलांतरण करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत पोलीस विभागाच्या समन्वयाने करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यात विक्री होत असलेल्या स्टिंग एनर्जी ड्रिंक या हानिकारक शीतपेयाबाबत**

**(१४) * १२२७८ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये स्टिंग एनर्जी ड्रिंक हे शीतपेय पिण्याचे प्रमाण लहान मुलांमध्ये व तरुणांमध्ये वाढत असून विद्यार्थी आणि वाहन चालक झोपेवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे शीतपेय पित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शीतपेयातील कॅफिन, व साखर या घटकांचे मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या प्रमाणामुळे झोप न येणे, डोकेदुखी, पोटाचे विकार, हृदयाचे विकार जसे की हृदयाचे ठोके वाढणे, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका येणे असे आजार होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन हानीकारक शीतपेयावर निर्बंध घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

Sting हा पदार्थ Caffeinated Beverages या अन्नपदार्थ वर्गात मोडतो. यासाठी अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स ॲन्ड फूड ॲडिटिव्हज) विनियम, २०११ मधील नियम २.१०.६.२(ii) अन्वये कॅफीनचे प्रमाण किमान १४५ मिलीग्राम/लिटर आणि कमाल ३०० मिलीग्राम/लिटर ठेवण्याची तरतूद आहे. तसेच, अन्न पदार्थांच्या लेबलवर "Consume not more than ५०० ml per day", तसेच "Not recommended for children, pregnant or lactating women, and persons sensitive to caffeine" अशी वैधानिक सूचना (Mandatory Warning) असणे आवश्यक आहे.

(३) सन २०२४-२०२५ या कालावधीत Sting Energy Drink या अन्नपदार्थाचे १६ नमुने घेण्यात आले होते. यापैकी १४ नमुने प्रमाणित असून २ नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्रतिक्षाधीन आहेत.

केंद्र शासनाच्या अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम १६ नुसार अन्न पदार्थांची मानके निश्चित करण्याचा अधिकार भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI), नवी दिल्ली यांना आहे. त्यानुसार, अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI), नवी दिल्ली यांनी Caffeinated Beverages ची मानके व सेवन करण्याचे प्रमाण निश्चित केले असून केंद्र शासनाने अशा शीतपेयावर कोणतेही निर्बंध घातलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई- विरार महानगरपालिका (जि.पालघर) जुचंद्र येथे बनावट कागदपत्र तयार करुन केलेला गैरव्यवहार**

**(१५) * ७०८१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका (जि.पालघर) क्षेत्रातील जुचंद्र येथे श्री.परेश या विकासकाने बनावट कागदपत्राच्या आधारे इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) घेतले असल्याचे दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी श्री. वाय.एस.रेडडी, उपसंचालक, नगररचना विभाग यांनी नालासोपारा पोलीस ठाणे येथे दिनांक ४ मे, २२०२५ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे,

(२) अंशत: खरे आहे,

सदर प्रकरणी नायगांव पोलीस ठाणे येथे संबंधित विकासकाविरूध्द दि.११.०३.२०२५ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी नायगाव पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३६(३),३३८,३४०(२), ३४१, ३(५) प्रमाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ०२०८/२०२५ नोंद करण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी कामगारांना मुंबईमध्येच घरे मिळण्याबाबत**

**(१६) * ७४८५ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती मोनिका राजळे**

**(शेवगांव), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गिरणी कामगारांना लवकरात लवकर मुंबईमध्ये हक्काचे घर मिळालेच पाहिजे या मागणीसाठी राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली परळ येथे मेळावा आयोजित करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गिरणी कामगारांना मुंबईमध्ये घरे मिळावीत यासाठी खटाव मिलची जमीन एन. टी. सी. मिल क्रमांक १-२ च्या जमिनीवर वस्त्रोद्योग म्युझियम येथील उर्वरित जागा, मिठागरची जागा, तसेच बीडीडी चाळ पुनर्विकासातील घरे गिरणी कामगारांना मिळण्यासाठी राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष यांनी बैठक घेण्याबाबत कामगारांकडून मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास एकूण किती गिरणी कामगार व त्यांचे वारस घरे देण्यासाठी पात्र आहेत, त्यानुसार आतापर्यंत किती गिरणी कामगारांना वा त्यांच्या वारसांना घरे देण्यात आली आहेत तसेच उर्वरित किती गिरणी कामगार/वारसदार यांना घरे देणे बाकी आहेत, त्यांना विशिष्ट कालावधीत घरे देण्याबाबत शासनाने कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील गिरणी कामगारांना मुंबईत घरे मिळावित यासाठी गिरणी कामगारांच्या शिष्टमंडळाने मा. उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी आपल्या मागण्या मांडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार गिरणी कामगारांनी मांडलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली परळ येथे मेळावा आयोजित केल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) मुंबई कामगारांना मुंबई शहरात घरे उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक २५.०४.२०२५ च्या बैठकीत बोरीवली येथील खटाव मिलच्या जागेवर गिरणी कामगाराना घरे देण्याबाबत तसेच एन.टी.सी. मिल च्या मालकीच्या जागेवर घरे देण्यासंदर्भात मागणी केली होती.

राष्ट्रीय वस्त्रोदयोग महामंडळाच्या मुंबईतील ९ गिरण्यांच्या जागेवरील ११ चाळींपैकी मुंबई टेक्सटाइल मिलच्या जागेवर १ उपकरप्राप्त इमारत आहे. या मिलची संपूर्ण जागा नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन (NTC) तर्फे पुनर्विकासाकरिता सन २००७ मध्ये दिलेली आहे. उर्वरित १० चाळींपैकी ६ चाळी या उपकरप्राप्त आहेत.
तसेच उर्वरित ४ चाळींना म्हाड अधिनियम १९७६, कलम ८२ (१) मधील तरतुदीनुसार "क" वर्गवारी उपकर दि.३१.०३.१९६१ पासून लावण्यात आला आहे

राष्ट्रीय वस्त्रोदयोग महामंडळाच्या मुंबईतील ९ गिरण्यांच्या जागेवरील ११ चाळींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली विनियम ३५ किंवा विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ (७) व ३३(९) अंतर्गत करावा याबाबत नगर विकास विभागामार्फत कार्यवाही सुरू आहे. तसेच,खटाव मिल जमीनीचा हिस्सा निरंक आहे
(३) गिरणी कामगारांना आतापर्यंत १५,८७० घरकुलांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| वर्ष | एकूण घरकुले |
|---|---|
| २०१२ | ६९२५ |
| २०१६ | २६३४ |
| २०१६ | २४१७ |
| २०२० | ३८९४ |
| एकूण | १५,८७० |

म्हाडा व कामगार विभागाने घेतलेल्या विशेष मोहिमेंतर्गत आत्तापर्यंत ९८,६१९ गिरणी कामगार पात्र झाले आहेत.

मुंबईतील बंद/आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास (MMR) क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक १५.०३.२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार शक्तीप्रदत्त समितीच्या मान्यतेने EoI प्रसिध्द करून दोन विकासकांची निवड करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, गिरणी कामगारांकडून दिनांक १६.०६.२०२५ पासून Online फॉर्म भरण्यात येत असून आतापर्यंत, एकूण २,०९४ अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत.
(४) होय, हे खरे आहे.
(५) उपरोक्त भाग -२ मध्ये नमूद केल्यानुसार खटाव मिलमधील जागा म्हाडास प्राप्त झालेली नाही. राष्ट्रीय वस्त्रोदयोग मंडळाच्या जागेबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नगर विकास विभागामार्फत कार्यवाही सूरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिवती (जि. चंद्रपूर) तालुक्यामध्ये संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१७) * ८४५४ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल, विधवा, परित्यक्ता इत्यादींना आधार देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निराधार योजनेत पात्र नसलेल्या लोकांना पात्र ठरवून शासकीय निधीचा अपहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास,जिवती (जि. चंद्रपूर) तालुक्यातील तहसिल कार्यालयात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील ९९ लाख रूपये श्री. रमेश जाधव, श्री. सुदर्शन केंद्रे, श्री. बळीराम राठोड व लिपीक श्री.पांडूरंग नंदूरकर यांनी आपल्या खात्यात वळते करून गैरव्यहार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चंद्रपूर जिल्ह्यातील गैरव्यवहारासंदर्भात कारवाई करण्याची मामागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, बल्लारपूर यांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक १ मार्च,२०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच राज्यातील जे लाभार्थी पात्र नसूनही त्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे अश्या अपात्र लोकांकडून पैशांची वसूली करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) व (२) जिवती (जि. चंद्रपूर) तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निराधार योजनेमध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) अपात्र लाभार्थ्यांकडून पैशांच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(५) जिवती (जि. चंद्रपूर) तालुक्यामध्ये संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेत झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उपविभागीय अधिकारी, राजूरा यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी पथक नेमले होते. सदर पथकाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने, सदर प्रशासकीय तसेच वित्तीय अनियमिततेस जबाबदार असलेल्या संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील अशासकीय आरोपींवर फौजदारी गुन्हे दाखल करुन त्यांनाही अटक करण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी पोलीस यंत्रणेकडून तपास सुरु आहे.

सदर प्रकरणातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत चौकशी पथकाने शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाकडून संबंधितांवर विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या राणीच्या बागेतील प्रस्तावित मत्सालयाच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(१८)** * **७३०० डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या राणीच्या बागेतील प्रस्तावित मत्सालयाच्या निविदा प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची कार्यवाही रद्द करुन मंजुरी प्रक्रियेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) याबाबत श्री. रईस शेख, मा.वि.स.स. यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना लिहीलेले पत्र आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना प्राप्त झाले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रस्तावित मत्स्यालयाच्या कामाकरिता दि.१५.०३.२०२४ रोजी प्रथमत: निविदा मागविण्यात आली. सदर निविदेस विहीत कालावधीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने दुसऱ्यांदा दि.२६.०६.२०२४ पर्यंत निविदेचा कालावधी वाढविण्यात आला. त्यावेळी २ निविदांचा प्रतिसाद प्राप्त झाला. तद्नंतर महानगरपालिकेच्या नियमानुसार पुढील प्रक्रिया पार पडली असून निविदेप्रक्रियेमध्ये कोणतीही अनियमितता आढळून आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली महानगरपालिकेच्या कामामध्ये झालेली अनियमितता

**(१९)** * **१२०८३ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली महानगरपालिकेने आर्थिक लाभापोटी बेसुमार खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेला रुपये १०० कोटींचा भुर्दंड बसला असून १ हजार कोटींच्या कामांमध्ये “क्लबिंग” झाल्याने रुपये २०० कोटींचे नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे गत ७ वर्षातील महापालिकेच्या कारभाराची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी आयुक्त, सांगली महानगरपालिका यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक लाभापोटी केलेली योजनांची अंमलबजावणी, बेसुमार खरेदी करून जिल्हा नियोजन व राज्य शासनाचा सुमारे १ हजार कोटींच्या विकास निधीचा विनियोग करताना विकास कामे क्लब करुन कोणतीही स्पर्धा न होता काही मोजकेच कंत्राटदार त्यास पात्र होतील, अशी व्यवस्था केली असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानीच्या वसुलीसह संबंधित जबाबदार असणाऱ्या सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही
(२) अशा आशयाची मागणी महानगरपालिकेकडे केली, हे खरे आहे.
(३) व (४) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने आर्थिक लाभापोटी बेसुमार खरेदी केलेली नसून कामांचे क्लबिंग देखील केलेले नाही. विकास कामे करतांना विहीत प्रक्रियेचा विलंब केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नाही. सद्यस्थितीत सन २०२२-२३ पर्यतचे लेखापरिक्षण सुरु असून लेखापरिक्षणामध्ये येणाऱ्या आक्षेपांची पुर्तता महानगरपालिकेकडून करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या (जि. ठाणे) शक्तिधाम रुग्णालयात एका महिलेचा झालेला मृत्यू**

**(२०) * ९५८६ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण पूर्वेतील शक्तिधाम रुग्णालयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आलेल्या एका तीस वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित दोषींवर कारवाई करण्याचे आदेश महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी आशा वर्कर यांना विशिष्ट उद्दिष्ट देण्यात येते त्याबाबत देखील तपास करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृताच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण पूर्वेतील शक्तिधाम रूग्णालयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या एका तीस वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यु झाला, ही बाब खरी आहे.
(२) व (३)
सदर प्रकरणाची चौकशी सुरू असून, चौकशी अहवाल आल्यानंतर जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल, असे महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडून सांगण्यात आले होते. तथापि, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी आशा वर्कर यांना शासनाकडून टार्गेट देण्यात येते, अशा प्रकारचे कोणतेही व्यक्तव्य महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडून करण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(४) सदर प्रकरणी मृत पावलेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याचे महानगरपालिकेचे कुठलेही धोरण नाही. त्यामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
•अशा प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२६.०३.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये, डॉक्टर / रूग्णालय यांचेकडून उपचारा दरम्यान हलगर्जीपणा झाला किंवा कसे, याबाबत तपास करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.
•कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शक्तीधाम प्रसूतीगृह, कल्याण (पूर्व) येथील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेच्या मृत्युबाबत जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेमार्फत चौकशी सुरू असून, चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नगरपंचायत बाभुळगाव (जि. यवतमाळ) येथील डंपीग ग्रांउडसाठी शेतजमीन खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(२१) * १२५२७ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगाव (जि. यवतमाळ) येथील नगरपंचायत अंतर्गत डंपीग ग्रांउडसाठी बेबंळा कालव्याला लागुन गणोरी परीसरामध्ये १ हे ३१ आर. जमीन खरेदी केली असल्याचे दिनांक २९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळमालक शे. आसिफ शे. इमाम यांच्याकडून मुख्याधिकारी नगरपंचायत बाभुळगाव यांनी शिवार गणोरी गट नं १४४ क्षेत्र १ हे ३१ आर जमीन रु.२१,७४,१७२/. या भावाने खरेदी केली असून जमिनीचा सरकारी भाव रु. ५,१७,२०९/ असून यात एवढी तफावत असतांना नगरपंचायतने रु.७०,३२,९७० ला दिनांक ९ मे, २०२५ रोजी शेत जमिनीची खरेदी करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास. सरकारी भावाप्रमाणे जमीन रु.५,१७,२०९/ ची असताना सदर जमीन नगर पंचायत बाभुळगाव येथील अधिकारी व कर्मचारी यांनी रु. ७०,३७,९७०/ रुपयामध्ये खरेदी करण्याची कारणे काय आहेत

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त जमीन खरेदीत आर्थिक गैरव्यवहार करणारे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीनुसार अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४.०६.२०२४ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आलेली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास महामंडळाने सुरगाणा येथील वाऱ्हे (जि.नाशिक) येथून खरेदी केलेल्या तांदूळाची गुजरातमध्ये काळयाबाजारात केलेली विक्री**

**(२२) * ७३२० श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाने सुरगाणा येथील वाऱ्हे (जि.नाशिक) भात (साल) खरेदी केलेला ६५ हजार ४५० क्विंटल तांदूळ गुजरातमध्ये काळाबाजारात विक्रीसाठी पाठविण्यात आल्याने ३८ कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तांदूळ ४० रुपये प्रति क्विंटल दराने भाडे देऊन चाळीसगाव येथे डाळ मिलमध्ये प्रक्रियेसाठी पाठविला जात असल्याचे दाखवण्यात आले असुन प्रत्यक्षात तो माल नाशिकहून थेट गुजरातमध्ये नेताना सुरगाणा येथे स्थानिक नागरिकांनी ट्रक थांबवून पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भात भरडाई करुन त्याचा ६७ टक्के तांदूळ हा जिल्हा पुरवठा खात्याच्या गोदामात जमा करणे कंत्राटदाराला बंधनकारक असतांना महामंडळांच्या गोदामातील या भाताची भरडाई नाशिक जिल्हयात न करता तो थेट गुजरातमध्ये नेला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,कंत्राटदारांनी १ लाख ६५ हजार ५४० विंक्टल भात भरडाई करुन त्याचा ६७ टक्के तांदूळ नाशिकच्या पुरवठा विभागास प्राप्त झाला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार कंत्राटदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी उचल देण्यात आलेल्या २४३७ क्विंटल धानापैकी काही धान गुजरातला नेत असल्याबाबत बातमी प्रसिद्ध झाली होती. तद्नुषंगाने आदिवासी विकास महामंडळामार्फ़त स्थापन केलेल्या समितीकडुन चौकशी करण्यात आली आहे.
(३) गिरणीधारकाला उचल दिलेल्या ३४७९९.०८ धानापैकी २७२६८.६६ क्विंटल धानाचा तांदूळ गिरणीधारकाकडुन शासनास जमा केला आहे. समितीने केलेल्या प्रत्यक्ष तपासणीमध्ये गिरणीधारकाकडे अंदाजे ७२७१.६४ क्विंटल तांदूळ व धानाच्या स्वरुपात भात आढळुन आले आहे.
(४) अंशतः खरे आहे.
दि. ३ मे, २०२५ अखेर ७१,६०७ क्विंटल धानाचा ४२,२४४ क्विंटल तांदूळ शासकीय गोदामात जमा करण्यात आला आहे. उर्वरित धानाची भरडाई व तांदुळ जमा करणे अद्याप सुरु आहे.
(५) आदिवासी विकास महामंडळाकडुन संबंधित मिलर्सची बँक गॅरंटी रक्कम रु. २ कोटी १० लक्ष जप्त करण्यात आली आहे. अध्यक्ष, जिल्हा धान भरडा समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडुन पणन हंगाम २०२४-२५ करीताचा करारनामा रद्द करण्यात आला आहे.

-----------------

## वाशिम शहर व ग्रामीण (जि.वाशिम) भागातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

**(२३) * ११२४८ श्री.श्याम खोडे (वाशिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम (जि.वाशिम) शहराचा मुख्य जलस्त्रोत असलेल्या एकबुर्जी मध्यम प्रकल्पातील पाण्याने तळगाठला असल्याने हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना पायपीट करावी लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाशिम शहरातील पाणीटंचाई दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने अशा परिस्थितीत पालकमंत्री यांनी पाणीटंचाईच्या ज्वलंत प्रश्नावर चर्चा केली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी ट्रॅक्टर मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाशिम शहरासह ग्रामीण भागात उद्भवलेल्या पाणीटंचाईच्या गंभीर समस्येकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने जिल्हातील जनतेत नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वाशिम शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
वाशिम शहराचा मुख्य जलस्त्रोत असलेल्या एकबुर्जी मध्यम प्रकल्पामध्ये दि. २६/०५/२०२५ रोजी उपलब्ध असलेला पाणीसाठा नगरपरिषदेने कळविल्यानुसार शहरास पुढील ३ महिन्यांसाठी पुरेसा होता.
(२), (३) व (४)

वाशिम शहरास वार्षिक पाणी पुरवठा करण्यासाठी एकबुर्जी मध्यम प्रकल्पामधून सन २०२५-२६ साठी ५.२६ द.ल.घ.मी पाणी आरक्षण केलेले आहे. नगर परिषद, वाशिम जलशुध्दीकरण केंद्र हे १६ MLD चे असून, शहरास सदयस्थितीत दररोज १५ MLD पाणी पुरवठा केला जातो. वाढती लोकसंख्या लक्षात घेता भविष्यात अतिरिक्त पाण्याची आवश्यकता असल्यामुळे वाशिम शहरापासून जवळ असलेल्या सोनल मध्यम प्रकल्पामधून अंदाजे ६.०० द.ल.घ.मी पाण्यासाठी नगर परिषद मार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान कार्यक्रमा अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, सदरील प्रस्ताव नगरपरिषदेकडून तांत्रिक मंजुरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वाशिम विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून वाशिम जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये पाणीटंचाईवर मात करण्यासाठी १७९ विहीर अधिग्रहण व १० टँकर अशा एकूण १८९ उपाययोजना मंजूर करण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाचा जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत वाशिम जिल्ह्यामधील एकूण ७४१ योजनांपैकी २९० योजना पूर्ण झाले आहेत. उर्वरीत ४५१ योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार शहरातील (जि.पालघर) सर्विस सेंटरवर निर्बंध घालण्याबाबत

**(२४)** * **७४७२ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान धरण तलावातील पाणीसाठा कमी होऊन वसई-विरार शहर तसेच तालुक्यातील गावागावांत विहीर व कुंपनलिकांची पाणी पातळी अत्यंत कमी होऊन पाणीटंचाई सुरु झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणीटंचाई टाळण्यासाठी उपाययोजना म्हणून पालिका क्षेत्रात सर्विस सेंटरवर निर्बंध घातले आहेत मात्र वसई विरार शहरातील सर्विस सेंटरवरील निर्बंधाबाबत कोणतेही निर्देश दिलेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वसईत असलेल्या अंदाजे तीनशे ते साडेतीनशे सर्विस सेंटर द्वारे मोठ्या प्रमाणावर जल व वायू प्रदूषण होत असून ऑटोमोबाईल सर्विस सेंटरला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे संमती पत्र घेणे, पुरेशी हवा, जल प्रदूषण नियंत्रण आणि विल्हेवाटची सयंत्रणा असणे बंधनकारक असतानाही या नियमांची काटेकोर अंमलबजावणी न करता अनेक ठिकाणी हे सेंटर सुरू असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्विस सेंटरला लागणारे पाणी हे खाजगी विहिरी, तलाव, बावखळ किंवा बोअरिंग द्वारे पुरविले जाते त्यामुळे शहरातील पाण्याचा प्रचंड उपसा होत असतो, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्विस सेंटरवर निर्बंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही,
महापालिकेमार्फत सर्विस सेंटरला नळजोडण्या दिलेल्या नाहीत. सन २०२४-२५ या वर्षात महानगरपालिका क्षेत्रातील ४०३ सर्विस सेंटर व गॅरेजला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २३० व २३१ अन्वये नोटीसा बजाविण्यात आल्या असून कार्यवाही करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) अंशत: खरे आहे,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सर्विस स्टेशन उद्योगाला जल कायदा, हवा कायदा व घातक घनकचरा नियम अंतर्गत संमतीपत्र प्रदान करण्यात येतात. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सर्विस स्टेशन चालविण्याकरिता आलेल्या अर्जानुसार सर्विस स्टेशनची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येते व त्यानुसार सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा आणि हवा प्रदूषण नियंत्रण व्यवस्था उपलब्ध असल्यास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्र देण्यात येतात. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत वसई तालुक्यात अंदाजे १६ सर्विस स्टेशन यांना संमतीपत्र देण्यात आलेले आहेत. संमतीपत्र प्राप्त उद्योगांची प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान त्रूटी आढळल्यास जल कायदा १९७४, हवा कायदा १९८१ व घातक घनकचरा नियम २०१६ अंतर्गत कार्यवाही करण्यात येते.
(४) हे खरे नाही,
शहराच्या पाणी पुरवठयावर कोणताही परिणाम होत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील सप्तशृंगी इमारतीतील स्लॅब कोसळून झालेली दुर्घटना

**(२५) * ११७६५ श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) पूर्वेतील सप्तशृंगी या चारमजली इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील स्लॅब कोसळून दिनांक २० मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास भीषण दुर्घटना होऊन त्यात सहा निष्पाप रहिवाशांचा मृत्यू झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारत धोकादायक असल्याबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने जाहिर केले असून सदर इमारतीतील रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक होते , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर धोकादायक इमारतीमध्ये अद्यापही तेथील रहिवाशी जीव मुठीत घेऊन राहत आहेत हे ही, खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू दुर्घटनेची शासनाने सखोल चौकशी करुन सदर इमारतीतील रहिवाश्यांचे इतरत्र स्थलांतरण करण्याबाबत तसेच दुर्घटनेतील मृत व जखमींना आर्थिक मदत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कल्याण पूर्वेतील सप्तशृंगी चारमजली इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत जखमी रहिवाशांपैकी ६ व्यक्तींचे मृत्यु झाले होते व उपचारादरम्यान एका रहिवाशाचे मृत्यु झाला आहे,असे एकूण ७ रहिवाशांचे मृत्यु झाले, ही वस्तुस्थिती आहे

(२) सदर दुर्घटना घडली त्या दिवसापर्यंत सदरची इमारत धोकादायक असल्याची जाहिर केलेली नव्हती. दुर्घटना घडल्यानंतर इमारतीतील रहिवाशांच्या राहण्याची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत नुतन ज्ञानमंदिर शाळेत तात्पुरत्या स्वरूपात करून सर्व रहिवाशांना मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या होत्या.

(३) हे खरे नाही.

•सदर इमारत धोकादायक असल्याने निष्कासित करण्यात आलेली आहे. त्यामुळे अशी बाब नाही.

(४) सदर इमारतीमधील एका सदनिकाधारकाने महानगरपालिकेची परवानगी न घेता, तसेच इमारतीमधील इतर सदनिकाधारकांच्या सुरक्षिततेची काळजी न घेता, परस्पर स्वत:च्या सदनिकेचे दुरूस्तीचे काम सुरू केले होते. त्यामध्ये त्याच्या सदनिकेचे फ्लोरींग कोसळून त्या खालील सदनिकेचे स्लॅब एकमेकांवर आदळून ही दुर्घटना घडली आहे. सदर सदनिकाधारकावर स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर इमारतीबाबत प्राप्त स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्टच्या आधारे इमारत धोकादायक घोषित करून पुर्णत: निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

•सदर दुर्घटनेतील मयत व्यक्तींच्या कुटुंबियांना मा. मुख्यमंत्री सहायता निधी मधून प्रत्येकी रू. ५ लक्ष इतकी आर्थिक मदत करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात तांदूळ खरेदी व साठवणूक आणि प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२६) * ७९९९ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात तांदूळ खरेदी व साठवणूक आणि प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झालेल्या तीन प्रकरणात २ कोटी रुपये वसूलीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी माहे मार्च-एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. समितीच्या अहवालानुसार संबंधित दोषींकडुन १.३७ कोटींची वसुली करण्यात आली आहे. वसुलीची उर्वरित रक्कम जमा न करणाऱ्या संबंधिताची बँक गॅरंटी जप्तीची व स्थावर मालमत्तेवर बोजा चढविण्याबाबत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडून आदेशित केले गेले आहे. सबब, संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांना निलंबित करुन त्यांच्यावर पोलिस स्टेशन, गडचिरोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, नायर व कुपर रुग्णालयात नविन एमआरआय व सीटी स्कॅन मशिन खरेदीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२७) * ८६२२ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयात देशभरातून विविध आजाराचे असंख्य रुग्ण उपचारासाठी येतात, परंतु शताब्दी वर्ष साजरे करणाऱ्या केईएम रुग्णालयाला आजही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले असून शताब्दी महोत्सवासाठी प्रशासनाकडून कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असून मशीनच्या कमतरतेमुळे एमआरआयसाठीही एक वर्षाचा प्रतिक्षा कालावधी लागत असून सीटी स्कॅनसाठीही रुग्णालयात प्रतिक्षा यादी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई तसेच महानगरपालिकेच्या मुख्य रुग्णालयांपैकी असलेल्या नायर व कुपर रुग्णलयामधील एमआरआय मशिन बंद असल्याचे नुकतेच माहे मे ,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शानास आले असून सद्य:स्थितीत असलेली एमआरआय मशिन जुनी असल्याने रुग्णांना बाहेरुन खाजगी रुग्णालयात चाचण्या कराव्या लागत असल्याने गरिब रुग्णांना नाहक आर्थिक भुंर्दड पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या दोन वर्षापासून मशिन खरेदीचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केईएम, नायर व कुपर रुग्णालयातील वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता रुग्णालयात नवीन एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्यासाठी शासनामार्फत कोणती तरतूद करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, केईएमच्या रक्तपेढीमध्ये १९ कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी १० कर्मचाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) मान्यता मिळालेली नसुन कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची एफडीए कडे नोंदणी करणे बंधनकारक असतांनाही कर्मचारी कार्यरत असल्याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) १९२६ रोजी स्थापन झालेल्या रा. ए.स्मा.रुग्णालयात १९५० आंतररुग्णशय्या कार्यरत आहेत. या रुग्णालयात दैनंदिनी ६००० पेक्षा अधिक रुग्ण बाहयरुग्ण विभागात सेवा घेतात.

रुग्णालयात विशेष व अतिविशेष विभागाच्या सर्व सेवा या माफक दरात उपलब्ध केल्या जातात. रुग्णालयामधील क्ष-किरण विभागामध्ये १ एम.आर.आय. मशीन, २ सी.टी. स्कॅन मशीन कार्यरत आहे. अपघात विभाग व अतिदक्षता विभागातील रुग्णांना प्राधान्य रुपाने सेवा दिल्या जातात. तसेच फक्त तातडीचे नसलेल्या एम.आर.आय. तपासणी करीता रुग्णांना पुढील तारीख दिली जाते.

(२) सायन रुग्णालयात २ एम.आर.आय. मशीन व खाजगी प्रकल्पांतर्गत १ अशा ३ एम.आर.आय. मशीन कार्यरत आहेत. तसेच डॉ. रु.न. कुपर व हिंदूहदय बाळासाहेब ठाकरे ट्रामा रुग्णालयात २ मशीन खाजगी प्रकल्पांतर्गत कार्यरत

आहेत. नायर रुग्णालयातील एम.आर.आय. मशीन २०१८ मधील अपघाता नंतर बंद झाली असून नवीन मशीन खरेदीची प्रक्रिया चालू आहे. तथापि, रुग्णांना सायन, केईएम व उपनगरीय रुग्णालयातील खाजगी प्रकल्पातील एम.आर.आय. केंद्रामध्ये मनपाच्या दराने सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

(३) व (४) चार प्रमुख रुग्णालयातील अतिरिक्त ४ एम.आर.आय.मशीन यांची खरेदी निविदा दि.२५.०४.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेमध्ये एकच देकार प्राप्त झाल्या कारणाने पुनर्निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. यामुळे रुग्णांचा प्रतिक्षा कालावधी कमी होणार आहे. याशिवाय उपनगरातील रुग्णालय खाजगी सहभाग प्रकल्पांतर्गत एम.आर.आय. मशीन कार्यरत करण्यात आल्या आहे. तसेच, अतिरिक्त ५ ठिकाणी खाजगी भागीदारांमार्फत एम.आर.आय. व सी.टी.स्कॅन केंद्राच्या उभारणीसाठी निविदा राबविण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) रक्तपेढी मध्ये वैद्यकीय, निम्नवैद्यकीय कर्मचारी यांची अर्हता ही अन्न व औषध प्रशासनाकडून प्रसारीत केलेल्या अर्हतेनुसार ठरविण्यात येते. तसेच नव्याने कंत्राटी नेमणूक केलेल्या कर्मचारी यांना अन्न व औषध प्रशासनाकडून वैध मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी कालावधी दिला जातो. त्यानुसार सद्य:स्थितीत कार्यरत २२ कर्मचाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनाची वैद्य मान्यता प्राप्त आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंपरी चिंचवडमधील (जि.पुणे) येथे पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनांचा साठा जप्त केल्याबाबत**

**(२८) * ७५६३ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड शहरात (जि.पुणे) जप्त करण्यात आलेल्या सौंदर्यप्रसाधनांचा साठा पाकिस्तानातील लाहोर येथून आयात करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले असून संबंधित उत्पादक कंपनीकडे कोणताही आयात-निर्यात परवाना नसतानाही साठा शहरात आला असल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धायरी परिसरात सापडलेल्या २०,७२,४८७/- रुपये किमतीच्या सौंदर्य प्रसाधन साठ्यावर कारवाई करण्यात आली असून सदर साठा कर्नाटक व तेलंगणा राज्यातून आलेला असून पुणे अन्न व औषध प्रशासनाची परवानगी घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड आणि धायरी परिसरात जप्त करण्यात आलेल्या सौंदर्यप्रसाधन साठ्याच्या संदर्भात संबंधित दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले असून त्यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाने भिवंडीच्या (जि. ठाणे) दोन गोदामांवर टाकलेल्या धाडीत विनापरवाना सौंदर्याची साधने जप्त केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून इतर सौंदर्य प्रसाधनांचे पॅकिंग लेबलिंग मटेरियलही जप्त करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात सध्या सौंदर्यप्रसाधन तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळांची संख्या किती आहे व पुणे जिल्ह्यात नोंदणीकृत सौंदर्यप्रसाधन उत्पादक व सौंदर्य क्लिनिकची संख्या किती आहे,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मागील तीन वर्षांत राज्यात नियमबाह्यरित्या काम करणाऱ्या सौंदर्यप्रसाधन उत्पादकांवर व विक्रेत्यांवर तसेच आयात व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) मे. ब्युटी कॉस्मेटीक्स, चिंचवड, पुणे या सौंदर्य प्रसाधने विक्रेत्याने औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० चे उल्लंघन केल्यामुळे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये सौदर्यं प्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला. सदर साठ्यावर उत्पादकांचे संपूर्ण नाव, समुह क्रमांक, आयात परवाना नंबर इत्यादी तपशील उपलब्ध नव्हता.

तथापि, जप्त करण्यात आलेल्या साठ्यामधे एका सौंदर्य प्रसाधनावर मेड इन पाकिस्तान असे नमूद होते. सदर साठा विक्रेत्याने कोठून प्राप्त केला याबाबत पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी तपास करत असून त्यानुषंगाने विक्रेत्यावर न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.
२) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत सौंदर्य प्रसाधनांची विक्री करण्यास परवान्याची अथवा नोंदणीची तरतूद नाही.
(३) पिंपरी चिंचवड येथील मे. ब्युटी कॉस्मेटीक्स तसेच, धायरी येथील मे. यू आर दुगड प्रा.लि. पुणे विनापरवाना सौदर्यं प्रसाधनांचे उत्पादन केल्याबाबत या उत्पादकांविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.
(४) होय, हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने दि.०३.०४.२०२५ रोजी ठाणे येथे मे. मिर्फी हेल्थकेअर, भिंवडी व मे. नरेंद्र मार्केटिंग, भिंवडी या संस्थेमधून विना परवाना उत्पादीत सौंदर्य प्रसाधनाचा साठा, स्टिकर लेबल, कार्टन, रिकाम्या बाटल्या इत्यादी पंचानाम्याअंतर्गत जप्त करण्यात आल्या आहेत.
(५) महाराष्ट्र राज्यात सौंदर्य प्रसाधने तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासनाच्या तीन मान्यता प्राप्त प्रयोगशाळा आहेत.

पुणे जिल्हयात ४० नोंदणीकृत सौंदर्य प्रसाधने उत्पादक आहेत. सौंदर्य क्लिनिकचे नियमन औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व सौंदर्य प्रसाधने नियम, २०२० अंतर्गत केल्या जात नसल्यामुळे याबाबत माहिती उपलब्ध नाही.
(६) अन्न व औषध प्रशासनाने मागील तीन वर्षात सौदर्यं प्रसाधने उत्पादक ज्यांनी परवाना अटीचे अनुपालन केले नाही, अशा ५१ उत्पादकांचे परवाने निलंबित करण्यात आले असून २९ उत्पादकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत, औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत सौदर्यं प्रसाधने विक्रीसाठी परवान्यांची आवश्यकता नाही. तथापि, सौंदर्य प्रसाधनाच्या विक्री, साठा व वितरणासाठी नोंदणी/परवाना लागू करण्याकरीता सौंदर्य प्रसाधने नियम, २०२० अंतर्गत सुधारणा करण्याची विनंती केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयास विभागाच्या दि.३०.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

तसेच, सौंदर्य प्रसाधनांच्या आयातीचे नियमन हे केंद्र शासनाच्या CDSCO, नवी दिल्ली यांच्याकडून केले जाते.

-----------------

## पुणे शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाबाबत

**(२९) * ९९१० श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील जुन्या पेठा व गावठाण भागातील जुने खाजगी वाडे, चाळी, इमारती यांना झोपडपट्टीसदृश्य दर्शवून पुणे महानगरपालिका प्रशासनाने नगर विकास विभागाला न कळविता नियमबाह्यरित्या झोपडपट्टी घोषित करुन पुणे, झो.पु. प्राधिकरणाच्या दि.१ जुलै, २०१७ च्या बेकायदेशीर परिपत्रकाद्वारे झो.पु.यो. अंतर्गत त्यांचा पुनर्विकास केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम व्यावसायिक, महानगरपालिका अधिकारी व पुणे झो.पु.यो. कार्यालयातील अधिकारी यांनी संगनमताने मशाल या संस्थेकडून सदर झोपडपट्टयांचे बेकायदेशीररित्या सर्वेक्षण करुन म.न.पा.च्या वतीने सुमारे ४६ प्रकरणांना प्रशासकीय मान्यता दिल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन कामास परवानगी देताना बांधकाम व्यावसायिकांनी महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे बांधकाम शुल्काचे उत्पन्न देखील बुडविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ४६ प्रकरणांपैकी ३३ प्रकरणांना तातडीने स्थगिती देण्याबाबत "आपले पुणे" समितीच्यावतीने मा. मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण मंत्री, प्रधान सचिव, नगरविकास, प्रधान सचिव, गृहनिर्माण यांचेकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन दोषी बांधकाम व्यावसायिक व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही,

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक ०१/०७/२०१७ रोजीच्या परिपत्रकाअन्वये अघोषित झोपडपट्टी संदर्भातील पुनर्वसन प्रक्रिया निर्धारित केली असून प्रश्नात नमूद बाबी संदर्भात महानगरपालिकेच्या अहवालाआधारे पुनर्वसन प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सन २०१० ते २०२३ या कालावधीत एकूण ४६ पुनर्वसन प्रकल्पामध्ये खाजगी / शासकीय / निमशासकीय अशा अघोषित झोपडपट्ट्यांसंदर्भात पुणे महानगरपालिकेकडून झोपडपट्टी सदृश अहवाल प्राप्त झाले होते. तथापि, आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या मान्यतेने फेर पडताळणी करण्यात येऊन १३ योजनांमध्ये कार्यवाही सुरु असून, ३३ प्रकरणांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्तरावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) याबाबतचे "आपले पुणे" समितीचे पत्र विभागाच्या अभिलेखात आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहिल्यानगर जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने छापा टाकून विदेशी मद्य साठा जप्त केल्याबाबत**

**(३०) * ७२९३ श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकी ( ता.जि.अहिल्यानगर) शिवारातील दौंड रस्त्यावर राज्य उत्पादन शुल्क, मुंबई विभागाच्या भरारी पथकाने टाकलेल्या छाप्यात गोवा राज्यातून विक्रीसाठी आणलेला सुमारे रु.१,०५,१९,६००/- किंमतीचा विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आल्याचे दिनांक ५ एप्रिल,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त ठिकाणी जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये १ हजार ९५ विदेशी मद्याचे बॉक्स,एक सहा चाकी कंटेनर व एक मोबाईल फोन यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणी दोषी असलेल्या सर्व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार :** (१) व (२) हे खरे आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या राज्य भरारी पथकाने दि.०३.०४.२०२५ रोजी गोवा राज्यात निर्मित व विक्रीस आणलेला विदेशी मद्य साठा अवैधरीत्या वाहतूक होत असताना कारवाई केली आहे. यामध्ये, विदेशी मद्याचे १०९५ बॉक्स, एक आयशर ट्रक, एक मोबाईल असा एकुण रु.१,०५,१९,६००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी गुन्हा रजि क्र. २३२/२०२५ दि.०३.०४.२०२५ रोजी महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ), (ई) ८१, ८३ अन्वये नोंद केला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**झरी नगरपंचायत (जि.यवतमाळ) क्षेत्रात विकास कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याबाबत**

**(३१) * ११०९४ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी नगरपंचायत(जि.यवतमाळ) क्षेत्रात कोट्यवधी रुपयांची विकास कामे सुरु असून सदरची कामे अंदाजपत्रकानुसार केली जात नसून निकृष्ट दर्जाची कामे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभाग क्र.०३ मधील सीसी रस्ता, नालीसह वॉटर एटीएम बांधकामामध्ये अनियमितता झाली असून कामे निकृष्ट दर्जाची होत असून सदर कामांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरीकांनी झरी नगरपंचायतच्या मुख्याधिका-यांकडे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन दोषी कंत्राटदार व याकडे दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर कामांच्या चौकशीसाठी स्थानिक नागरिकांनी मे, २०२५ मध्ये मुख्याधिकारी, झरीजामणी यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले होते. झरीजामणी नगरपंचायत प्रभाग क्र.३ मध्ये सी.सी.रोड व नालीचे काम प्रगतीपथावर आहेत. सदर कामाचे मटेरियल टेस्टिंग रिपोर्ट समाधानकारक आहेत. तसेच अर्धवट रस्त्यांची, चेंबरची कामे पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदाराला नगरपरिषद झरीजामणी तर्फे दंडात्मक कारवाईसाठी नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी महानगरपालिका अंतर्गत असलेल्या मनपा शाळाच्या इमारतींची झालेली दुरवस्था**

**(३२) * ९३३६ श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरामध्ये महानगरपालिका अंतर्गत असलेल्या मनपा शाळांच्या इमारतींची दुरवस्था झालेली असल्याने प्राथमिक शाळा बंद करण्यात आल्या असून निजामपूरा मध्ये ५० वर्षापूर्वीच्या इमारतीची दुरवस्था झाल्याने तेथील शाळा बंद करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी शहरातील दुरवस्था झालेल्या सर्व शाळांची दुरुस्ती करून तेथे प्राथमिक शाळा सुरु करण्यात यावी अशी मागणी सामान्य नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार दुरवस्था झालेल्या सर्व शाळांची दुरुस्ती करून तेथे प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या निजामपूरा येथे सुरू असलेल्या शाळांच्या इमारती धोकादायक घोषित केल्याने विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका होऊ नये म्हणून नजिकच्या महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये शाळा सुरू केल्या आहेत. सदर शाळा ह्या बंद नसून स्थलांतरीत इमारतीमध्ये सुरू आहेत.
(२) खरे आहे.
(३) महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत व महाराष्ट्र सुर्वण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर योजनेअंतर्गत मनपा शाळा क्र.२२/६२ चे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच मनपा शाळा क्र.६५ व ६७ या शालेय इमारतींचे बांधकाम सुरू आहे.
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत धोकादायक शालेय इमारती पाडून नव्याने बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र

सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेअंतर्गत निधी प्राप्त करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई विरार (जि.पालघर) महानगरपालिका क्षेत्रात पंतप्रधान स्वनिधी योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३३) * ९५२१ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका क्षेत्रात पंतप्रधान स्वनिधी योजनेंतर्गत केंद्र व वसई-विरार महानगरपालिकेच्या नावाच्या बनावट लेटरहेडचा वापर करुन कर्जे घेऊन अनधिकृत दुकाने उभारण्यात आल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दुकानांवर पंडित दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय उपजीविका अभियान अंतर्गत मंजुरी देऊन वसई-विरार महानगरपालिका असे नाव लिहिण्यात येऊन दुकाने भाड्याने देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
वसई विरार महानगरपालिका दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय उपजिविका योजना अंतर्गत अशा नावाचा उल्लेख असलेल्या टपऱ्या/दुकाने वसई विरार महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिसून येत आहेत.
(३) वसई विरार शहर महानगरपालिका स्तरावरून या प्रकरणी प्राथमिक चौकशी सुरू असून संबंधित अज्ञात व्यक्ती विरोधात पोलीस आयुक्त कार्यालय, मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालय, भाईंदर (पश्चिम) यांच्याकडे लेखी तक्रार केलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे कोडीवटा (ता.अंधेरी) जोगेश्वरी (पूर्व ) न. भु. क्र.५५३ या शासकिय भूखंडावर असलेले अतिक्रमण निष्कासित करणेबाबत**

**(३४) * ८३१६ श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोडीविटा (ता.अंधेरी) जोगेश्वरी (पूर्व ) विधानसभा क्षेत्रातील महाकाली येथील न.भू क्र ५५३ इतर या शासकिय भूखंडावर असलेले अतिक्रमण निष्कासित करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर ,बांद्रे पूर्व ,मुंबई यांना दिनांक १ फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यासुमारास व त्यानंतर अनेक वेळा पत्रव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर संरक्षक भिंत ५० लाख रुपये खर्च करुन बांधलेली असतांनाही या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अतिक्रमण तात्काळ हटवून नागरी सुविधा उपलब्ध करुन भुखंड नागरिकांसाठी खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच भूखंडावर अतिक्रमण केलेल्यांवर व अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी विलंब करणाऱ्या संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी यांच्या कार्यालयातील भूमापकांमार्फत स्थळपाहणी केली असता, न.भू.क्र.५५३ या शासकीय भूखंडावर बांधण्यात आलेल्या संरक्षण भिंतीसभोवताली ११ अतिक्रमणे आढळून आली.
(३) व (४)
न.भू.क्र.५५३ या शासकीय भूखंडावर बांधण्यात आलेल्या संरक्षण भिंतीसभोवताली आढळून आलेल्या ११ अतिक्रमण धारकांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५० (३) अन्वये उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी-१ यांच्या कार्यालयातून अतिक्रमण निष्कासित करणेबाबत जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आली असून संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याकरिता नैसर्गिक न्यायसंधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकरणी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी यांच्यामार्फत अंतिम निर्णयाची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यात बोगस रेशनकार्ड बनविण्यात येत असल्याबाबत

**(३५) * ८२२२ श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बोगस रेशन कार्ड शोधण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने ३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास बनावट रेशन कार्ड शोध मोहिम राबविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत मिळणा-या सवलतीच्या अनुषंगाने धान्याचा लाभ प्राधान्य आणि अंत्योदय गटात लाभ घेणा-या अपात्र लाभार्थ्याची शोध घेण्याची मोहिम माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, राज्यात व सिंधुदुर्ग जिल्ह्यात उक्त मोहिमेत आतापर्यत किती बनावट रेशनकार्ड आढळून आले व किती जणांची रेशनकार्ड रद्द करण्यात आली आहेत,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार बनावट रेशनकार्ड बनवणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.
शासन परिपत्रक दि.४.४.२०२५ अन्वये राज्यात दरवर्षी दि. १ एप्रिल ते ३० मे याकालावधीत अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम राबविण्याबाबत क्षेत्रीय पुरवठा कार्यालयांना कळविण्यात आले आहे.
(२) सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये तपासणी फॉर्म उपलब्ध नसल्यामुळे तसेच सिंधुदूर्ग जिल्हा व शहर रास्तभाव धान्यदुकानदार संघटना, सिंधुदूर्ग यांनी दि. १७.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपात्र शिधापत्रिका शोध मोहिम फॉर्म स्विकारणार नसल्याचे लेखी पत्राव्दारे जिल्हा पुरवठा अधिकारी, सिंधुदूर्ग यांना कळविले असल्यामुळे सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये सदर मोहिम अद्याप राबविण्यात आलेली नाही.
(३) राज्यातील सिंधुदूर्ग जिल्ह्यासह ७ जिल्ह्यांमध्ये नमूना फॉर्म अभावी कार्यवाही सुरू झाली नाही. उर्वरित २८ जिल्ह्यांमध्ये मोहिम राबविण्यात येत असून लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या फॉर्मची तपासणी सुरू आहे. तसेच प्राथमिक तपासणी अहवालानूसार बीड जिल्ह्यामध्ये ५३९, परभणी जिल्ह्यामध्ये ४७२ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये ३१४२

अशा एकूण ४१५३ अपात्र शिधापत्रिका रद्द करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सार्वजनिक बांधकाम खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बेकायदेशीर कामांना मंजूरी देऊन शासनाची केलेली फसवणूक**

**(३६) * ७४२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या इमारतीचे काम, उड्डाणपुलाचे व रस्ते बांधण्याच्या कामाकरिता सरकारी व निमसरकारी विभागाकडून जे शुल्क आकारले जाते त्यातील ५० टक्के शुल्क सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व क्षेत्रीय स्तरावरील अभियंते आपसात वाटून घेतात असे गंभीर आक्षेप नागपूर महालेखाकार यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या लेखापरिक्षण अहवालात नोंदवले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २०१९ ते २०२२ या कालावधीत सुमारे १२ कोटी ५० लाख रूपये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांमध्ये शुल्क वाटप करण्यात आले असून सदर शुल्क वाटपासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५ फेब्रुवारी,२०१९ रोजीच्या शासन निर्णयास वित्त विभागाची मान्यताही घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महालेखाकार यांनी राज्यातील कोणकोणत्या कामामध्ये शासनाची फसवणूक केल्याचे अहवालात नमूद केले आहे,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त अधिकाऱ्यांनी त्याच्या बँक खात्यातून वळते केलेले पैसे त्याच्याकडून वसूल करण्याबाबत व या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यान्वीत करण्यात येणाऱ्या कामासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. तथापि, अन्य विभागाकडून कार्यान्वीत करण्यात येणाऱ्या कामांच्या तपासणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शुल्क आकारण्याची तरतूद महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीमध्ये उपलब्ध आहे.
महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार शुल्क वाटपाबाबत सन २००४ व २०१९ मध्ये सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या लेखापरिक्षण दरम्यान महालेखाकार, नागपूर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक २५ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयावर आक्षेप उपस्थित केलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(४) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार शुल्क वाटपाबाबत कार्यवाही केली असल्याने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. जलसंपदा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फतही अशाप्रकारे शुल्क आकारणी व वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येते. तथापि, महालेखाकार, नागपूर यांच्या आक्षेपास अनुसरुन व शासनाच्या विविध विभागाच्या शुल्क आकारणी व वाटप यांच्या नियमावलीमध्ये एकसुत्रता आणण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर समिती नेमण्याची बाब विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी (प) मुंबई येथील जय अंबे झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पात मुळ सदनिकाधारकांना ताबा देण्याबाबत

**(३७) * ८६६० श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओशिवरा, जोगेश्वरी (प.),मुंबई येथील न.भू.क्र. १ अ(पार्ट) सर्वे नं.४१ येथील जय अंबे झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पात पुनर्वसन इमारतीमध्ये मूळ सदस्यांना सदनिकांचा ताबा न देता बाहेरील व्यक्तीस सदनिका वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाकरिता बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबिरातील सदस्यांच्या नावे नविन झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण योजना विकासक सादर करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासक करीत असलेल्या गैरकारभाराबाबत झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण कार्यालयातील अधिका-यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन दि.२१ मार्च, २०२५ रोजी त्या सुमारास उपजिल्हाधिकारी, विशेष कक्ष यांना कार्यवाहीसाठी सहकार विभागाने पत्राद्वारे कळविण्यात आले होते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी विकासक व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जय अंबे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पातील पुनर्वसन इमारतीमध्ये त्याच योजनेतील पात्र व अपात्र झोपडीधारकांना तसेच इतर व्यक्तींना विकासकाने परस्पर ताबा दिलेला आहे.

(२) संक्रमण शिबीरातील झोपडपट्टीवासीयांनी अन्य विकासकामार्फत योजना सादर केली होती. तथापि, ती दप्तरी दाखल केली आहे.

(३) प्रस्तुत योजनेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांनी दिलेल्या मौखिक आदेशानुसार सहकार विभागातील प्रतिनिधी व अभियांत्रिकी विभागातील अभियंता तसेच उपजिल्हाधिकारी (विशेष कक्ष) विभागातील नायब तहसिलदार यांचे मार्फत दि.१४.१२.२०२४ रोजी संयुक्त स्थळपाहणी करण्यात आली. तद्नंतर अभियांत्रिकी विभाग, झोपुप्रा बृहन्मुंबई यांचेकडून दि.१४.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या उक्त स्थळपाहणी अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ अंतर्गत संबंधित सदनिकाधारकांविरुध्द निष्कासनाच्या कार्यवाहीसाठी उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे सुनावणी सुरु आहे.

(४) पात्र झोपडीधारकांऐवजी इतर व्यक्तींच्या रहिवासासंबंधी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे निष्कासनासाठी कलम ३३ अन्वये सुनावणी सुरू असून त्यातील निष्कर्षानुसार विकासकाचा सहभाग आढळून आल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या इगतपुरी ते भिवंडी येथील बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(३८) * ९२७२ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या अखेरच्या टप्यातील इगतपुरी ते भिवंडी दरम्यानच्या महामार्गात आदिवासी कुटुंबाच्या शेतजमिनी बाधित झाल्या असून त्याचा मोबदला अद्याप मिळालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गात बाधित झालेल्या आदिवासी नुकसानग्रस्तांना त्यांची थकित देणी मिळण्याकरिता त्यांनी दिनांक १७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास फुगाळा (ता.कसारा) बोगदा येथे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने नुकसानग्रस्तांना थकित देणी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी वन पट्टेधारकांचा संपादित क्षेत्राबाबत उपअधिक्षक भूमी अभिलेख शहापूर यांच्या कार्यालयास दिलेल्या निर्देशानुसार, उपअधिक्षक भूमी अभिलेख, शहापूर यांच्या कार्यालयाने वनपट्टेधारकांचा संपादित क्षेत्राबाबत दिनांक १६.०४.२०२५ व दिनांक २४.०४.२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे.

सदर प्रकरणी अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८ जिल्हास्तरीय समिती, ठाणे द्वारे मंजुर वनपट्टेधारकांचे महामार्गात संपादित क्षेत्राबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाकडून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास दिनांक २७.०५.२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे.

सदर अहवालात नमूद वस्तुस्थिती व GPS Co-ordinate याबाबत खात्री करुन भूसंपादनास पात्र असणाऱ्या भूधारकांच्या जमिनी संपादन करणेबाबत पुढील उचित कार्यवाही करणेबाबत महामंडळाचे कार्यकारी अभियंता व उपजिल्हाधिकारी तथा प्रशासक नवनगरे, ठाणे यांना कळविणेत आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या (जि. ठाणे) रुक्मिणीबाई आणि शास्त्रीनगर या दोन रुग्णांलयाना सरकारी दर्जा देण्याबाबत

**(३९) * ८५१० श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान उपचारासाठी आलेल्या एका महिलेस रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न झाल्याने तसेच प्रसूतिसाठी अन्य रुग्णालयात हलविण्यात विलंब झाल्याने दोन गर्भवती महिलांचा मृत्यू झाला असून रुग्णालयाकडून आरोग्य सुविधा पुरविल्या जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, ही खरे आहे काय,

(२) सदरहू ,कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रातील रुक्मिणीबाई आणि शास्त्री नगर या दोन रुग्णालयांना सरकारी रुग्णालयाचा दर्जा देण्याचा ठराव सन २००९ आणि सन २०१२ साली मंजूर करण्यात आला असूनही प्रशासनाकडून मागील १४ वर्षापासून अंमलबजावणी झाली नसल्याचे दि. १५ मे २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कल्याण- डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये सरकारी रुग्णालयाचा दर्जा देऊन त्याची अंमलबजावणी करून स्थानिकांसाठी आरोग्याच्या सुविधा तसेच डॉक्टर -कर्मचाऱ्यांची तात्काळ नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मृत्यु झालेल्या महिलेच्यासंदर्भात तिच्या नातेवाईकांनी मागणी केल्यावर ४८ तासांत चौकशी पूर्ण करुन तिच्या मृत्युस जबाबदार असलेल्यां विरोधात कारवाई केली जाणार असल्याचे आश्वासन महापालिकेच्या आरोग्य खात्याचे उपायुक्त यांनी दिले असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली करुन संबंधित जबाबदार दोंषी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रूक्मिणीबाई रूग्णालयात उपचारासाठी आलेल्या महिलेस अन्य रूग्णालयात नेण्यासाठी वेळेवर रूग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने, एका महिलेचा मृत्यु झाला, ही बाब खरी आहे.

•परंतू प्रसूतीसाठी अन्य रूग्णालयात हलविण्याकरिता विलंब झाल्याने दोन गर्भवती महिलांचा मृत्यु झाला, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

•कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शास्त्रीनगर रूग्णालयात प्रसूतीसाठी दाखल केलेल्या महिलेचा दि.१३.०२.२०२५ रोजी मृत्यु झाला आहे व शक्तिधाम रूग्णालयात गर्भपात व कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी दाखल झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यु झाला आहे. सदर घटना ह्या दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या आहेत.

•सदर रूग्णालयाकडून विशेषज्ञ डॉक्टर्सच्या सल्ल्याने आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३)

•कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रूक्मिणीबाई व शास्त्रीनगर या दोन रूग्णालयांना सरकारी रूग्णालयाचा दर्जा देणेकरिता सर्वसाधारण सभेने दि.३०.०७.२००९ अन्वये ठराव क्र. ३९ व दि.२५.०७.२०१२ रोजी ठराव क्र. ४४ पारीत केलेले आहेत.

•सदर रूग्णालयांना सरकारी दर्जा देणेकरीता दोन्ही रूग्णालयाची जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचे पथकाकडून दि.३०.११.२०१९ रोजी पाहणी करण्यात आलेली आहे.

•सदर पथकाने मागणी केल्याप्रमाणे, त्यांना दोन्ही रूग्णालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच वैद्यकीय उपकरणांची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

•जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांनी दि.१७.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये काही बाबींची पुर्तता करण्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस कळविले असून, याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) अशा प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२६.०३.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये, डॉक्टर / रूग्णालय यांचेकडून उपचारा दरम्यान हलगर्जीपणा झाला किंवा कसे, याबाबत तपास करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

•रूक्मिणीबाई रूग्णालय, कल्याण (प.) येथे रूग्णवाहिका वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे महिलेचा मृत्यु झाला, त्याअनुषंगाने महानगरपालिकेने चौकशीअंती संबंधित सिस्टर इन्चार्ज व वाहनचालक यांचेवर निलंबनाची कार्यवाही केली आहे. तसेच, बाह्यसंस्थेमार्फत नियुक्त वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांना कामावरून कमी करण्यात आले आहे. तर संबंधित रूग्णालयाच्या प्रभारी मुख्य वैद्यकीय अधिकारी व प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडून सदर घटनेच्या अनुषंगाने खुलासा मागविण्यात आला आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिका येथील मिठी नदीतील गाळ न उपसताच देयके मंजुर करुन केलेला गैरव्यवहार**

**(४०) * ७२११ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीमधील गाळ उपसणे,नदीची साफसफाई करणे इत्यादी कामात ६५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत पोलीस विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखेने आझाद मैदान पोलीस स्थानकात माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास गुन्ह्याची नोंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात नाल्यातील गाळ न काढता बांधकामांच्या साईटवरील माती आणि राडारोडा हाच नाल्यातील गाळ म्हणून नोंद करून कंत्राटदार अधिकाऱ्यांच्या संगनमताने देयके पास करून घेत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शानास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील नदी व नाले व नालेसफाईतील गैरव्यवहार याबाबत सुरु केलेले ॲप कंत्राटदार स्वत:च चालवित असल्याने प्रत्यक्षात नालेसफाई होत नसल्याचे व त्याची देयके अदा होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामाच्या अनियमिततेमुळे आर्थिक गुन्हे शाखा विभागाने सन २०२५ मध्ये कंत्राट वाटपावेळीच्या व्हिडोओ रिकार्ड तसेच सन २००६ ते २०२४ या कालावधीत कामे दिलेल्या कंत्राटदार कंपनींची यादी व इतर माहिती महानगरपालिकेच्या पर्जन्य जल अंभियता यांच्याकडून मागविली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणांमध्ये अपराहित झालेल्या रक्कमेची वसुली करणे, गाळ काढणे या कामासंदर्भात समिती नेमणे,मिठी नदी अतिक्रमण व प्रदुषणमुक्त करुन नदीचे पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहेत,
(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व जबाबदार संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) याबाबत आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र.७५/२०२५, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व १२० (ब) भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करुन सदर गुन्हा पुढील तपासाकरीता आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करुन आर्थिक गुन्हे विभागाकडे गुन्हा नोंद क्र.५०/२०२५ प्रमाणे नोंद घेण्यात आली.
(२) हे अंशत: खरे आहे.

अशा स्वरुपाच्या घटना एम/प विभाग व एस विभागात आढळून आलेल्या आहेत. एम पश्चिम विभागातील संबंधित कंत्राटदारास ३ वर्षासाठी काळया यादीत टाकण्यात आले आहे. संबंधित कंत्राटदारास कोणत्याही स्वरुपाचे अधिदान करण्यात आलेले नाही. तसेच, एस विभागातील कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.
(३) या प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दक्षता विभागामार्फत चौकशी करण्यात आली असून एस विभागातील दोषी कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.
(४) सन २००६ ते २०२३ या कालावधीत मिठी नदी संबंधीत कामे दिलेल्या कंत्राटदार कंपन्यांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून आर्थिक गुन्हे शाखेस दि.०२ मे, २०२५ रोजी पाठविण्यात आली आहे.
(५) शासनाने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने दि. २०/०३/२०२४ च्या आदेशान्वये मिठी नदीच्या पुनर्जिवितेसंदर्भात सन २००५-२०२३ या कालावधीकरीता केलेल्या कामाच्या अनुषंगाने पोलीस सह आयुक्त (आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस उप आयुक्त, गुन्हे विभाग यांच्या थेट पर्यवेक्षणाखाली ३ वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विशेष चौकशी पथक (SIT) गठीत करण्यात आले. चौकशी अहवाल तयार करण्याची कार्यवाही चौकशी समिती स्तरावर सुरु आहे.

मुंबई महानगरपालिकेमार्फत मिठी नदीतील प्रदुषण नियंत्रित करण्यासाठी माहे जानेवारी, २०१७ मध्ये सल्लागार मे. फ्रिशमन प्रभू यांची नेमणूक करण्यात आलेली होती. सल्लागाराने सादर केलेल्या तांत्रिक व व्यवहार्यता अहवालानुसार लघु मुदतीची (पॅकेज-१) व दीर्घ मुदतीची (पॅकेज -२, ३ व ४) कामे सुचविली आहेत व त्यातील पॅकेज-१ मधील कामे पूर्ण झालेली असून, पॅकेज-२ व ४ मधील कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, पॅकेज-३ च्या कामाची निविदा मागविण्यात आली आहे.

आजतागायत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील मिठी नदीचे ९७ टक्के रुंदीकरणाचे व ९१ टक्के प्रवाह निश्चित करण्याचे काम पूर्ण झाले आहे. बाधित झोपडी धारकांची पात्रता/अपात्रता निश्चित करण्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

बाधित बांधकामे निष्कासित केल्यानंतर पॅकेज -२ अंतर्गत प्रस्तावित उर्वरित कामे पूर्ण करण्यात येतील.
(६) याबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे चौकशी करुन दोषी कंत्राटदार व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे जबाबदार अधिकारी यांचे विरुध्द गुन्हा नोंदणी क्रमांक गुरक्र.५०/२०२५, कलम ४०६, ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व १२० (ब) भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यात ABD योजनेंतर्गत दिघंची ते हेरवाड या रस्त्याच्या दुतर्फा केलेल्या वृक्षारोपणात झालेला गैरव्यवहार

**(४१) * १२०८६ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात ABD योजनेंतर्गत राज्य मार्ग १५३ भाग दिघंची ते हेरवाड या रस्ते कामासोबत रस्त्याच्या दुतर्फा वृक्षरोपण कामात कंत्राटदार व विभागाचे संबंधित अधिकारी यांनी संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वृक्षारोपणाचे केवळ १० टक्के काम केलेले असतानाही कंत्राटदाराला तत्कालिन उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आटपाडी व विद्यमान कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यांनी संपुर्ण देयके अदा केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सन २०२४-२५ मध्ये विश्रामबाग, जि.सांगली येथील कर्मचारी निवासस्थानात एकही कर्मचारी वास्तव्यासाठी नसतानाही दुरुस्ती कामांसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग मिरज यांनी सुमारे १ कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग , मिरज यांच्या कार्यकाळात झालेली कामे निकृष्ट दर्जाची असणे, कंत्राटदारांनी कामे अपूर्ण केलेली असणे असे असतानाही कंत्राटदारांना पुर्ण देयकांची अदायगी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, संबंधित अधिकाऱ्याच्या कार्यकाळातील सर्व कामांची व त्यांच्याकडील बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करणेबाबत अनेक सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.
सदरची कामे प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे कार्यान्वित करण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) निवेदन प्राप्त नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मांजरीतील माणिकनगर (ता.हवेली , जि.पुणे) येथील एका गोदामातून भेसळयुक्त पनीर ची विक्री होत असल्याबाबत

**(४२) * ७६३० श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विक्री होणाऱ्या पनीरपैकी ७० टक्के पनीरमध्ये दुधाऐवजी वनस्पती तूप वापरून बनविण्यात येणारा ॲनालॉग चीज हा पदार्थ पनीरमध्ये भेसळकरुन राजरोसपणे विक्री करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माणिकनगर परिसरातील मांजरी (जि.पुणे) एका गोदामावर अन्न व औषध प्रशासन विभाग (FDA) आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत १४०० किलो भेसळयुक्त पनीर, १८८० किलो एसएमपी पावडर व ७१८ लिटर पामतेल जप्त केले असून सदर गोदामात परवानगीशिवाय व अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन करत पनीर उत्पादन व भेसळ प्रक्रिया सुरू होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पिंपरी चिंचवड शहरात सण उत्सवाच्या काळात पनीर आणि मिठाई विक्रितून अधिक नफा कमवण्यासाठी काही दुकानदार व व्यवसायिकांकडून भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री केली जात असल्याच्या तक्रारी येत असून भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने केवळ १७९ अन्नपदार्थांचे नमुने तपासण्यात घेऊन २८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे जिल्ह्यासाठी मान्यताप्राप्त अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांच्या ४७ पदांपैकी फक्त १५ पदांवर अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून उर्वरित पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन भेसळ करणाऱ्या उत्पादकांविरुद्ध कारवाई करून शहरातील भेसळयुक्त अन्नपदार्थ विरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत, बनावट पनीर अन्नपदार्थ तपासण्यासाठी प्रयोगशाळा उपलब्ध करण्याबाबत तसेच विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,

(६)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

(२) अन्न व औषध प्रशासनाने दि.०९.०३.२०२५ रोजी पुणे येथील मे.आर.एस. डेअरी फार्म्स, माणिक नगर, मांजरी खुर्द, पुणे या आस्थापानेतून पनीर, स्कीम मिल्क पावडर, ग्लिसरेल मोनो स्टेरिइट, RBD Palmolien Oil, ग्लासियल ॲसिटिक ॲसिड असे एकूण ०५ नमुने विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित सर्व अन्नपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

विश्लेषणासाठी घेतलेल्या पनीर या अन्न पदार्थाचा नमुना असुरक्षित घोषित झाला असुन सदर प्रकरणात खटला दाखल करण्यात येत आहे.

(३) (४) व (५) अन्न व औषध प्रशासनामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात ०१ ऑगस्ट २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या सणासुदीच्या कालावधीत मिठाईचे १२ व पनीरचे ०४ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. मिठाईचे सर्व नमुने व पनीरचे ०३ नमुने प्रमाणित घोषित झाले असून पनीरच्या ०१ नमुना कमी दर्जाच्या घोषित झाला आहे. कमी दर्जाच्या नमुन्याच्या अनुषंगाने न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात सन २०२४ - २५ या कालावधीत विविध अन्न पदार्थाचे एकुण १८२ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असुन त्यापैकी १४२ अन्न नमुने प्रमाणित, २४ नमुने कमी दर्जा / मिथ्याछाप व असुरक्षीत घोषीत झाले तसेच १६ अन्न नमुन्याचे अहवाल अप्राप्त आहेत. कमी दर्जा / मिथ्याछाप व असुरक्षीत नमुन्यांप्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ नुसार कारवाई करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनात एकूण नवीन १८९ अन्न सुरक्षा अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यासाठी ४७ अन्न सुरक्षा अधिकारी पदे मंजूर असून सद्यस्थितीत ४१ पदे भरलेली आहेत. उर्वरित ०६ पदे रिक्त आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथे प्रयोगशाळा कार्यरत असून पुणे व नाशिक येथे प्रयोगशाळेचे बांधकाम सुरू आहे. तसेच, अमरावती व कोकण विभागासाठी नवीन प्रयोगशाळा उभरण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिका (जि.पालघर) सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी राखीव असलेल्या भुखडांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४३) * ७४२३ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका(जि.पालघर) क्षेत्रात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी राखीव असलेल्या ६० एकर जमिनीवर बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेल्या ४१ इमारतींना बनावट मंजुरी दाखवून त्यातील सदनिका सामान्य नागरिकांना विकल्याप्रकरणी दिनांक ८ जुलै २०२४ रोजी उक्त इमारती पाडण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून देखील दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी या इमारती पाडण्यात आल्याने सुमारे २,५०० कुटुंब बेघर झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वसई-विरार महानगरपालिकेतील नगररचना विभागाचे उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्या हैदराबाद येथील निवासस्थानी अंमलबजावणी संचालनालयाने दि १४ व १५ मे २०२५ रोजी छापा टाकून ८.६ कोटींची रोख रक्कम आणि २३.२५ कोटींचे हिरेजडित दागिने व सोन जप्त केल आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने उक्त अधिकारी , या प्रकरणी अन्य दोषी अधिकारी/ कर्मचारी तसेच यात सहभागी विकासक यांच्याविरुद्ध एम आर टी पी कायद्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच इमारत पाडल्यामुळे बेघर झालेल्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) खरे आहे,

अंमलबजावणी संचालनालयाच्या दि.१५.०५.२०२५ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकात श्री.रेड्डी यांच्या निवासस्थानी रू.८.६ कोटींची रोख रक्कम आणि रू.२३.२५ कोटींचे दागिने व सोने जप्त केले असल्याचे नमूद आहे.

(३) श्री. रेड्डी यांच्या निवासस्थानी अंमलबजावणी संचालनालयाने टाकलेल्या छाप्याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती वसई विरार शहर महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही. तथापि, याबाबत वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्याने शासनाची बदनामी झाली असल्याने श्री. रेड्डी यांना दि.१९.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच, त्यांचे विरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, नगररचना विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नगररचना विभागाच्या बाहेर बदल्या करण्यात आल्या आहेत. सदर ४१ इमारतींच्या निर्माणात सहभागी असलेल्या विकासकांवर MRTP कायद्यातील तरतूदीनुसार ३९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) अनधिकृत इमारती निष्कासित केल्यानंतर सदर इमारतीतील रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाने विकासकामांसाठी अल्पमुदतीत निविदा काढून केलेला गैरव्यवहार

**(४४) * ७४०८ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये विविध विकासकामांसाठी अल्पमुदतीत निविदा प्रक्रिया राबवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकार विभागामधील अधिकारी व कर्मचारी यांचे संगनमताने सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करणेबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम यांचेकडे दि.२२ एप्रिल, २०२५ रोजी तसेच वारंवार लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) निवेदन प्राप्त आहे.

(४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करणेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.